जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१
संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५७ वे ❖ अंक ४ था ❖ डिसेंबर २०२५ ❖ वीर संवत २५५२ ❖ विक्रम संवत २०८२

या अंकात पान नं.


- ।। जिनेश्वरी ।।
  अध्याय १ : विनय श्रुत १५
- कव्हर तपशील २६
- आओ ! दुर्ध्यान छोडे : १५. कांक्षा ध्यान ३१
  १६. गृध्दि ध्यान ३२
  १७. आशा ध्यान ३४
- गुरु आनंद तीर्थ – चिचोंडी ३७
- नफरत V/s प्यार ३८
- विवाह जमविण्यात येणाऱ्या अडचणी व उपाय ४३
- समय प्रतिबद्धता ४५
- लेश्या ४६
- बिने जाने कित जाऊँ – प्रश्नोत्तरी प्रवचन ५३
- जैन चिन्ह ५५
- हास्य जागृति ५६
- इतिहास घडवणाऱ्या मुली – भारताचा पहिला महिला क्रिकेट विश्वचषक विजय ५७
- नये संकल्प, आरमानों के संग नववर्ष ६९
- पानी पर क्यों चलना ? ७१
- बायो – क्लॉक ७३
- सम्यकत्व : चर्या का मूल केंद्र ७४
- राजाबाई क्लॉक टॉवर, मुंबई ७५
- पासवर्ड – Passward ७६
- शाश्वत सुख को जीवन का लक्ष्य बनाओ ७९
- जन्म दिवस : एक चिन्तन ८१
- मंत्राधिराज प्रवचन सार ८३
- बैंक बेलेन्स – DEPOSIT ८५
- दानवीर भामाशाह ८६
- चेतना ने जगा ९१
- जीवन की पावर फुल बातें ९२
- पुष्पा स्टील ''ग्रीन स्टील'' – प्रमाणपत्र ९३
- महर्षि आनंद सेवा भक्ती प्रतिष्ठान, पुणे ९५
- डॉ. धीरज जैन व डॉ. ममता जैन – आयकॉनिक पावर कपल ऑफ यूएई ९६

● मेरी भावना ९७
● जैन भोजन शाळा, कोथरुड, पुणे ९७
● प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया – ॲवार्ड ९८
● अहंकार है खाई, विनम्रता है शिखर १०३
● वधू–वर संमेलन, पुणे १०५
● श्री फलवृद्धि पार्श्वनाथ तीर्थ १०७
● डायग्नोपिन, पनवेल शाखा १०९
● भोसरी जैन स्थानक – भूमीपूजन १११
● रत्नसंदेश ११२
● जिनशासन के चमकते हिरे – सुबुध्दि मंत्री ११४
● जैन जागृति – दीपावली विशेषांक ११७
● सुरक्षा ११८
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या



जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)

* वार्षिक वर्गणी – रु. ८०० * त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००

जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र बाहेर)

* वार्षिक वर्गणी – रु. ९०० * त्रिवार्षिक वर्गणी – रु. २६००

मॅगझिन पोस्ट या सुविधेमुळे प्रत्येक ग्राहकांना १००% अंक ३ ते ४ दिवसात मिळणार.

या अंकाची किंमत ५० रु. ● Google Pay - M. 9822086997


## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.


जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/Google Pay - M. 9822086997/ AT PAR चेक/पुणे चेकने/RTGS इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

**Bank : STATE BANK OF INDIA ● Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146 ● IFS Code : SBIN0006117**

'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

## कव्हर तपशील - डिसेंबर २०२५

❖ **श्री फुलवृध्दि पार्श्वनाथ तीर्थ, मेडता रोड**
मेडता रोड, जि. नागोर, राजस्थान या तीर्थक्षेत्राची माहिती दिली आहे. (लेख पान नं. १०७)

❖ **जैन जागृति – दीपावली विशेषांक प्रकाशन**
जैन जागृति मासिकाच्या दीपावली विशेषांकाचे प्रकाशन वर्धमान सांस्कृतिक केंद्र, पुणे येथे उपाध्याय प.पू.श्री प्रवीणऋषिजी म.सा., श्री तीर्थेशऋषिजी म. सा., साध्वी श्री आदर्शज्योतीजी म.सा., साध्वी सुनंदाजी म.सा. आदी ठाणा व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. (बातमी पान नं. ११७)

❖ **पुष्पा स्टील – ''ग्रीन स्टील'' प्रमाणपत्र**
पुणे, सुपा येथील गणराज इस्पात प्रायव्हेट लिमिटेड ''पुष्पा स्टील'' कंपनीला केंद्र सरकारने ''ग्रीन स्टील'' प्रमाणपत्र २०२५ दिले. हे प्रमाणपत्र श्री. गौरव प्रमोदजी दुगड व श्री. प्रतीक पारसजी चोरडिया यांनी स्विकारले. (बातमी पान नं. ९३)

❖ **डॉ. धिरज – डॉ. ममता जैन सन्मान**
दुबई, यूएई - डॉ. धिरजजी जैन आणि डॉ. ममताजी धिरज जैन, वन एक्स एल (1XL) इन्फ्रा ॲड रिअल इस्टेट डेव्हलपमेंट एलएलसी (LLC) चे संस्थापक, यांना इंडिया टुडे ग्रुप आणि NKN मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आयकॉन्स ऑफ द यूएई अवॉर्ड्स सीझन ३ मध्ये ''आयकॉनिक पावर कपल ऑफ यूएई २०२५'' या सन्मानाने गौरविण्यात आले. (बातमी पान नं. ९६)

❖ **महर्षि आनंद सेवा भक्ती प्रतिष्ठान, पुणे**
पुणे : महर्षी आनंद सेवा भक्ती प्रतिष्ठानचे महर्षी आनंद सेवा पुरस्कार ज्येष्ठ समाज सेविका निर्मलाताई चंद्रकांतजी छाजेड, युवकांचे प्रेरणास्थान चि. जैनम धीरज जैन आणि कु. जीविका धीरज जैन यांना देण्यात आले. (बातमी पान नं. ९५)

❖ **डायग्नोपिन – पनवेल शाखा उद्घाटन**
डायग्नोपिन डायग्नोस्टीक पनवेल शाखेचे उद्घाटन युवाचार्य श्री. महेंद्रऋषिजी म.सा. यांच्या सान्निध्यात श्री. राजेशजी बांठिया, श्री. सतिशजी बनवट, श्री. प्रफुल्लजी कोठारी, श्री. मितेशजी कोठारी यांच्या हस्ते संपन्न झाले. (बातमी पान नं. १०९ )

❖ **प्रा. डॉ. संजयजी बी. चोरडिया – सन्मान**
सुर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन (SEF) चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी चोरडिया यांना शिक्षण व उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'पद्मविभूषण डॉ. श्री. मुरली मनोहर जोशी लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात आले. (बातमी पान नं. ९८)

❖ **श्री. प्रवीणजी चोरबेले – विश्वस्तपदी**
पुणे येथील मा. नगरसेवक व युवा कार्यकर्ते श्री. प्रवीणजी चोरबेले यांची विघ्नहर्ता न्यास पुणे पोलिस संस्थेच्या विश्वस्तपदी निवड झाली.

❖ **श्री. गिरीष पारख – नवरत्न चिक्की – पुरस्कार**
लोणावळा येथील सुप्रसिद्ध नवरत्न चिक्की या उद्योगाला लोणावळा औद्योगिक सहकारी वसाहत लि. तर्फे उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नवरत्न चिक्कीचे संचालक श्री. गिरीषजी धनराजजी पारख व त्यांच्या सहकार्यांनी पुरस्कार स्विकारला •

समाजाची आवड, समाजाची निवड
जैन जागृति

# विवाह जमविण्यात येणाऱ्या अडचणी आणि उपाय

**लेखक : श्रीपाल ललवाणी, पुणे. मो. ९८२३९७७४७२**

कुटुंब व्यवस्था हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. कुटुंब व्यवस्था भक्कम होण्यासाठी विवाह संस्था महत्त्वाची आहे. पण सध्या विवाह संस्थेलाच जोरदार हादरे बसत आहेत. मुला मुलीचे विवाहाचे वाढते वय यामुळे मागची पिढी चिंताग्रस्त आहे, तर विवाह करायचाच कशासाठी इथपर्यंत काही युवकांची विचारसरणी झाली आहे. समाज व्यवस्था टिकवायची असेल तर विवाह संस्था टिकणे आवश्यक आहे असे जाणकारांचे मत आहे.

दिवसें दिवस मुला मुलींच्या विवाहाचे वय वाढतच आहे. मुलींचे लग्नाचे वय ३०/३२ पर्यंत पोहचले आहे. तर मुलांचे ३५ पर्यंत. पंचविशीत सुंदर, आकर्षक दिसणारी मुलं मुली तिशीनंतर थोराड दिसू लागतात. वैद्यकशास्त्रा प्रमाणे तिशीनंतर मुल जन्माला घालणे आणि प्रसुतीत अनेक अडचणी येतात. त्यामुळे मुला मुलींचे विवाह तिशीच्या आतच होणे योग्य वाटते.

मुला मुलींच्या विवाह जमण्यात येणाऱ्या विविध अडचणींचा आणि त्यावरील उपायांचा आता आपण विचार करू.

**१) पत्रिका :** आजकाल बहुसंख्य पालक हे विवाह जमविण्यासाठी मुला मुलींची जन्म कुंडली जुळते की नाही हे पहात असतात. अनेक स्थळे कुंडली जमत नाही म्हणून नाकारली जातात. पत्रिका पहाण्यात अनेक मुला मुलींचे लग्नाचे वय उलटून जाते व चांगली स्थळेही हातातून जातात. खरे पहाता जन्मकुण्डली जमविण्याला वैज्ञानिक आधार काहीही नाही. या शास्त्राची गृहीतके ही वैज्ञानिक नाहीत. पत्रिका पहावयाची की नाही हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण मुला मुलींचे विवाह योग्य वयात जमवायची असतील तर पत्रिकेचा बाऊ करू नये असे वाटते.

**२) वय व उंची :** मुली पेक्षा मुलगा वयाने आणि उंचीनेही जास्त असावा अशी आपली पारंपरिक धारणा आहे. वयाचे व उंचीचे अंतर किती असावे या बाबतीत मात्र मतभिन्नता आढळते. मुला मुलीच्या वयात ३ वर्षापेक्षा जास्त अंतर नको तर उंचीत ३ इंचापेक्षा जास्त अंतर नको अशी आजची सर्वसाधारण धारणा आहे. वय आणि ऊँची यावर संसार सौख्य अवलंबून असते का याचा विचार केला पाहिजे. पूर्वीच्या काळी १०/१२ वर्षे अंतर असलेल्या जोडप्यांचे संसार व्यवस्थित पार पडलेले आपण पाहिले. मग या मुद्याला किती महत्व द्यायचे याचा विचार केला पाहिजे. मुलगी मुला पेक्षा थोडी मोठी वा उँच असल्यास त्याने काहीही फरक पडत नाही. आवश्यकता आहे, आपण ते मोकळेपणाने स्विकारण्याची. वयातील व उँचीतील फरकाच्या बाबतीत आपण थोडी लवचिक भूमिका घेतली पाहिजे.

**३) शिक्षण :** आजकाल बहुतेक मुली उच्चशिक्षित असतात. डॉक्टर मुलीसाठी डॉक्टरच मुलगा, सी.ए. मुलीसाठी सी.ए. मुलगाच बघण्याचा कल सर्वसाधारणपणे मुलींच्या पालकात दिसून येतो. त्यामुळे निवडीला वाव कमी मिळतो. त्यामुळे असा आग्रह धरण्यापेक्षा मुलगा उच्चशिक्षीत आहे ना, आपल्या मुलीच्या शिक्षणाचा उपयोग, करीअर करण्यासाठीची संधी मिळेल ना हे पाहिले पाहिजे.

**४) साका (गोत्र) :** जैन समाजात अनेक ठिकाणी स्वतः, मामा, दादी व नानी अशा ४ साका पाहिल्या जातात. खरे तर दोनच साका (स्वतः व मामा) ही

काळाची गरज आहे. काही लोक पुढच्या च्या दोन पण स्वतःच्या मात्र ४ साका पहातात. असे करू नका. दोन्ही बाजूच्या दोनच साका पहा.

**५) पंथभेद :** जैन समाजात श्वेतांबर व दिगंबर असे २ मुख्य पंथ असून अनेक उपपंथ आहेत. प्रत्येक उपपंथात दस्सा, बिस्सा असे फरक आहेत. सर्व चालिरिती एक असल्या तरी विवाह ठरवताना दस्सा, बिस्सा हा फरकही चालत नाही. अशा कृतीमुळे स्थळ निवडताना खूपच मर्यादा येतात. आजच्या आधुनिक युगात पंथ भेद न मानता मुलगा व मुलगी जैनच आहे ना, ते शाकाहार पाळतात ना हे पाहिले पाहिजे.

**६) जॉब व करीअर :** हल्ली बहुतेक मुली या शिकलेल्या असतात आणि आपल्या शिक्षणास अनुरूप करीअर करण्याची त्यांची मनीषा असते. स्त्रीच्या पूर्ण वेळ नोकरीमुळे तीला अनेक आघाड्यांना तोंड देत तारेवरची कसरत करावी लागते. सुन जर पूर्ण वेळ नोकरी करणारी असेल तर त्यासाठी आवश्यक वातावरण सासरच्या लोकांनी देणे आवश्यक आहे.

**७) विशिष्ट शहराचा आग्रह :** हल्ली बहुतेक मुली या तांत्रिक शिक्षण घेतात. त्यामुळे आपले पुढचे करीअर करण्यासाठी त्या विशिष्ट शहराचा आग्रह धरतात. पुणे, मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद या पलिकडे जाण्याची त्यांची तयारी नसते. पण नाशिक, संभाजीनगर या सारख्या गावांचाही विचार करायला पाहिजे. छोट्या गावातल्या मुलांच्या विवाहाचा प्रश्न तर फारच बिकट झाला आहे. कोणतीही उच्चाशिक्षीत मुलगी छोट्या गावात जायला अजिबात तयार नसते. एवढेच काय तर छोट्या गावातल्या मुलींनाही छोट्या गावात विवाह करणे मान्य नसते. यावर उपाय म्हणजे लहान गाव सोडून आपण मोठ्या शहरात बस्तान बसवणे आवश्यक झाले आहे. हे संक्रमण ही काळाची गरज आहे. छोट्या गावातल्या मुलींना अशा पध्दतीचे शिक्षण व संस्कार दिले पाहिजेत की छोट्या गावात राहण्याची त्यांची मानासिकता होईल. हे सर्व अवघड असले तरी सध्या याला पर्याय नाही.

**८) आर्थिक परिस्थिती :** ज्या दोन परिवारात विवाह संबंध होणार असतात, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत फार तफावत नसावी. एखाद्या सधन घरातील मुलीने गरीब मुलाशी लग्न करून सुखाने राहणे हे फक्त सिनेमातच होत असते. फिल्मी आदर्शवादाच्या नादी लागून वास्तवा कडे पाठ फिरवू नये. मुलीवाल्यांना हल्ली मुलगा अगदी चांगला स्थिर स्थावर झालेला हवा असतो. स्वतःचा फ्लॅट, गाडी असणारा पाहिजे असतो. ३० वर्षाच्या मुलाकडून या अपेक्षा योग्य आहेत का ? पती पत्नी दोघांनी मिळून कष्ट करुन या गोष्टी साध्य करता येतील अशी मानसिकता ठेवावी.

**९) कुटुंब पध्दती :** सध्या बहुतेक करून विभक्त कुटुंबच पहायला मिळतात. अनेक भाऊ, एकत्र राहण्याचे दिवस केव्हाच मागे पडले. 'तुमच्या घरात डस्ट बीन आहे का?' असे मुलीने विचारल्याच्या तथाकथित कहाण्या मध्यंतरी बऱ्याच ऐकायला मिळायच्या. पण ते खरे नाही. घरात ज्येष्ठ व्यक्ती असावी अशी मुलीवाल्यांचीही हल्ली अपेक्षा असते. घरात सासु सासरे किंवा एखादा भाऊ बहीण असलेले स्थळच मुलीसाठी शक्यतो पहावे. नाईलाज असेल तरच नवरा-बायको दोघांनीच वेगळे रहावे.

**१०) गृहकाम :** मुलींनी गृहकृत्यदक्ष असले पाहिजे अशीच अपेक्षा अजूनही मुलावाल्यांची असते. करीअर करायला हरकत नाही पण घरातले सर्व काम करून करीअर करा असे मुलाकडचे सांगताना आढळतात. या उलट, आमची मुलगी उच्चशिक्षीत असून तीला चांगला जॉब आहे, तीला स्वयंपाक येत नाही असे मुलीचे पालक स्पष्टपणे सांगतात. आजच्या युगात मुलालाही स्वयंपाक करता येणे गरजेचे झाले असताना, मुलीला स्वयंपाक करता येत नाही हे सांगणे योग्य वाटत नाही. वेळ प्रसंगी मुलगा व मुलगी दोघांनाही घरातील सर्व कामे करता आली पाहिजेत.

मुलीचे शिक्षण चालू असतानाच तीला घरकामाचे पण धडे दिले पाहिजे. मुलाकडच्यांनीही, मुलगी करीअर करत असेल तर संपूर्ण घरकाम करणे तीला शक्य होणार नाही हे समजून घेतले पाहिजे. करीअर आणि कुटुंब यांचा योग्य मेळ साधता आला पाहिजे, मुलीची, त्या दृष्टीने मानसिक तयारी पालकांनी केली पाहिजे.

'आमच्या फार काही अपेक्षा नाहीत' असे मुला-मुलीवाले म्हणत असले तरी वरील बहुतेक मुद्यावर ते ठाम असतात. प्रत्येक मुद्यात सुचविल्याप्रमाणे तडजोड केल्यास विवाह जमण्यातील अडसर कमी होतील आणि विवाह जमणे सुकर होईल. अनेकजण चार पाच वर्षे स्थळं पाहिल्यानंतर एकेक तडजोड करायला लागतात. त्या ऐवजी सुरूवातीलाच तडजोड केल्यास योग्य वयात मुला मुलींचे विवाह होतील यात शंका नाही. हल्ली मुला मुलींनाही स्वतःची मते असतात, ती नक्कीच विचारात घेतली पाहिजेत. पण वेळप्रसंगी आपल्या मतांना मुरड घालण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे ही पालकांची जबाबदारी आहे. अजून फार वय झालेले नाही. असे समजत सुरुवातीला चांगली स्थळे नाकारली जातात आणि ज्यावेळी तडजोड करायची तयारी होते तेव्हा वय उलटून गेलेले असते.

**शेवटी सर्वात महत्त्वाचा मुद्दा :**

गेली अनेक वर्षे जैन समाजात बायोडाटाचे काम करणारे श्री. पृथ्वीराजजी धोका सूचवितात त्याप्रमाणे वरील १० मुद्यांना प्रत्येकी १० गुण द्या आणि एकूण गुणांची बेरीज ७०/८० झाली तरी विवाहास संमती द्या. आपल्या अपेक्षा १००% कधीच पूर्ण होत नसतात याची जाणीव मुला-मुलीवाल्यांनी ठेवावी.

समाजातील विवाहेच्छुक मुलामुलींचे विवाह योग्य वयात व्हावेत ही इच्छा ठेऊन केलेला हा लेखप्रपंच. लेख कसा वाटला या संबंधी आपण आपल्या प्रतिक्रिया खालील क्रमांकावर कळवाव्यात.

श्रीपाल ललवाणी - ९८२३९७७४७२

दिलीप ललवाणी - ९८२३५१५८५९

## समय प्रतिबद्धता

जनरल करिअप्पा के भाई कुमारप्पा पहली बार गांधीजी से मिलने वर्धा के आश्रम पहुँचे। वहाँ सिरपर गमछा बांधे एक वृद्ध झाडू लगा रहे थे। कुमारपाल ने उसे कहा कि जाओ गांधीजी को मेरे आने की खबर दो। वृद्ध ने पूछा, गांधीजी ने कितने बजे मिलने का समय दिया है?

कुमारप्पा गुस्से से बोले, इससे तेरा क्या मतलब? तू अपना जाके खबर दे कि जनरल करिअप्पा के भाई कुमारप्पा आये हैं। समय तो चार बजे का दिया है। वृद्ध ने विनम्रता से कहा ''लेकिन अभी तो साढे तीन बजे हैं। कुमारप्पा तिलमिला उठे। बोले- ज्यादा होशियार मत बनो। जो मैंने कहा वैसा करो। तो वह वृद्ध चुपचाप अन्दर जाकर लौटा और बोला, चार बजे मिलेंगे। कुमारप्पा बड़े बेमन से गादी पर बैठे।

घड़ी ने चार के डंके बजाये उसी के साथ वह वृद्ध सिर का गमछा खोलकर बोले, साहब! क्या काम है मुझे ही लोग गांधी कहते हैं। कुमारप्पा ऐसे हो गये जैसे कांटो तो खून न हो। लेकिन गांधीजी की समय प्रतिबद्धता एवं महानता उनके हृदय को आन्दोलित कर गई।

## कडवे प्रवचन

**लेखक : तरुणसागरजी म.सा**

बाहर की आँखें बंद होने से पहले भीतर की आँख खुल जानी चाहिए वरना तुम्हारा नाम अंधों की सूची में लिखा जाएगा । आप किसी को सुधार पाओ, न सुधार पाओ पर अपनी आँखों को जरुर सुधार लेना क्योंकि सारी गड़बड़ियाँ आँखों से ही शुरु होती है । इस बात को कभी मत भूलना कि जब तक आँख खुली है, तब तक ही सब अपना है । आँख बंद होते ही सब सपना हो जाएगा ।